# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

---

दिनांक 11.01.2019 शुक्रवार

(गुन्हे)

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुदाका अन्वये 02 केसस 02 आरोपींना अटक करून, 1,840 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 09 केसस 13 आरोपींना अटक करून 20,685 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा—या 91 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 1215 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 2,86,700 वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. वाडी — घरफोडी :**

दिनांक 09.01.19 चे 1100 वा ते 10.01.19 चे 0730 वा दरम्यान पो.स्टे. वाडी हद्दीत प्लॉट नं 51, गणेश नगर, आठवा मैल, नागपूर येथे राहणारे फिर्यादी विठ्ठलराव किसनजी कुंभारे, वय 62 वर्ष, यांनी आपल्या घराला कुलूप लावून परिवारासह तेरवीच्या कार्यक्रमाकरीता बाहेरगावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने मुख्यदाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून दोन लोखंडी आलमारी व एक लाकडी आलमारीतुन सोन्या चांदीचे दागिने व नगदी 65,000 रू असा एकुण 1,23,500 रू चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. वाडी येथे सपोउपनि रामकृष्ण खोडे, 9822931649 यांनी आरोपीविरूध्द कलम 454,457,380 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**3) पो.स्टे. गिट्टीखदान, यशोधरानगर, कळमना — प्राणांतीक अपघात :**

1) गिट्टीखदान — दिनांक 10.01.19 चे 1530 वा ते 1545 वा दरम्यान हरिराम पृथ्वीपाल यादव, वय 68 वर्ष, रा. प्लॉट नं 43, प्रशांत हाऊसिंग सोसायटी, रोज कॉलनी, श्याम लॉन जवळ, नागपूर हे आपली स्कुटी पेप गाडी क्र. एमएच/31/डी.बी./1871 ने अवस्थीनगर चौकाकडून मानकापूर येथील शिवमंदीरात श्रीरामकथा करीता जात असतांना पो.स्टे. गिट्टीखदान हद्दीत मानकापूर रोड, झिंगाबाई टाकळी कडे जाणा—या नविन पुला जवळ पांढ—या रंगाचा आयसर ट्रक क्र. एमएच/04/जीआर/2312 चा आरोपी चालक शेरबहादुर देवराज यादव, वय 32 वर्ष, रा. चिंचवटी, गंजारी पाढा बाबा चाळ, तह. वसई जि. पालघर याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे हयगयीने चालवून हरीराम यांचे स्कुटीला धडक मारून त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. याप्रकरणी फिर्यादी कमलेश हरीराम यादव, वय 35 वर्ष यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. गिट्टीखदान येथे पोउपनि एच.आर. इंगोले, 7722011239 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,304(अ) भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली आहे.

2) यशोधरानगर — दिनांक 10.01.19 चे 2330 वा चे सुमारास कृष्णा प्रभाकर बारापात्रे, वय 43 वर्ष, रा. प्लॉट नं 1185, संतोष नगर, नागपूर हे आपल्या कामावरून सायकलने घरी जात असतांना पो.स्टे. यशोधरानगर हद्दीत ईटा भट्टी चौक, नागपूर येथे बारा चाकी ट्रक क्र.

एमएच/40/एन/2929 चा आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवून कृष्णा यांचे सायकलला धडक मारून त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. याप्रकरणी फिर्यादी विनोद विठोबाजी पौनिकर, वय 46 वर्ष, रा. प्लॉट नं 1406, विनोबा भावे नगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. यशोधरानगर येथे सपोनि पी.जे. बावणकर, 9423606243 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,304(अ) भादंवि सहकलम 134,177 मोवाका अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>3) कळमना</u> – दिनांक 10.01.19 चे 2200 वा चे सुमारास रामविलास धिरजपाल वर्मा, वय 40 वर्ष, रा. डिप्टी सिग्नल, बाजार चौक, नागपूर हे आपल्या सायकलने जात असतांना पो.स्टे. कळमना हद्दीत अशीर्वाद कॉम्प्लेक्स समोर, एचबी टाऊन चौक, नागपूर येथे आयसर ट्रक क्र. एमएच/04/सीजी/8817 चा आरोपी चालक निखीलेश राजेश गजभिये, वय 29 वर्ष, रा. बाबुलबन, गरोबा मैदान, प्लॉट नं 116, आंबेडकर चौक, नागपूर याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवून रामविलास यांचे सायकलला समोरून धडक मारून त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. याप्रकरणी फिर्यादी छोटु रामविलास वर्मा, वय 24 वर्ष याने दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमना येथे पोउपनि एस.एस. सोनपरोते, 9923429340 यांनी आरोपी चालकविरूध्द कलम 279,304(अ) भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>4) पो.स्टे. कळमना – विनयभंग :</u>

दिनांक 10.01.19 चे 1630 वा चे सुमारास पो.स्टे. कळमना हद्दीत राहणा–या 28 वर्षीय फिर्यादी या आपल्या घरी हजर असतांना आरोपी राहुल मेश्राम, वय 28 वर्ष, रा. नवाब पुरा, गंगाबाई घाट, नागपूर याने फिर्यादीचे घरात प्रवेश करून हात पकडून त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमना येथे पोउपनि एस.एस. सोनपरोते, 9923429340 यांनी आरोपी विरूध्द कलम 461,354 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे

## <u>(अकस्मात मृत्यु)</u>

<u>पो.स्टे. धंतोली, सोनेगाव, पाचपावली, सिताबर्डी, तहसील, गिट्टीखदान :</u>

<u>1) धंतोली</u> – दिनांक 10.01.19 चे 1230 वा चे सुमारास रामाविर पुन्ना धाकड, वय 27 वर्ष, रा. बोरावली, (कपोरा), ता. कैलारसा, जि. मुरैना, म.प्र. याने पो.स्टे. धंतोली हद्दीत एफसीआय गोडावून येथे छताचे लोखंडी पत्रे लावण्यासाठी सिढीने चढत असतांना सिढीसह खाली पडल्याने जखमी झाला त्याला उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. धंतोली येथे मपोउपनि रामटेके, 9669167002 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

<u>2) सोनेगाव</u> – दिनांक 10.01.19 चे 1330 वा चे सुमारास मुर्ती के. कंदस्वामी, वय 42 वर्ष, रा. 263, सेंथली नगर, नंदाथाई, अर्थनानी पल्लम मनकल, तामीळनाडू यांनी पो.स्टे. सोनेगाव हद्दीत खापरी मिहान मेट्रो कार डेपो जवळ, डाऊन ट्रॅक पोल क्र. 823/20 येथील झाडीत झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी बसंतसिंग उर्फ राजेश निळकंठसिंग ठाकुर, वय 34 वर्ष, रा. रामनगर, वार्ड नं 25, बैतुल, म.प्र. यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. सोनेगाव येथे पोउपनि राठोड, 9767921291 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

<u>3) पाचपावली</u> – दिनांक 28.12.18 चे 1600 वा चे सुमारास दशरथ रविंद्र वर्मा, वय 45 वर्ष, रा. ठक्करग्राम, सुशीलाबाई हेडावू यांचे घराजवळ, नागपूर हे पो.स्टे. पाचपावली हद्दीत रानी दुर्गावती चौक, गोलु परातेचे घरी फेटा बांधायला गेला असता सिढी वरून पायस्लीप होवून खाली पडल्याने तो जखमी झाला त्याला उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 10.01.19 चे 0400 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. पाचपावली येथे पोउपनि टी.एम. ढाकुलकर, 9922995362 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

<u>4) सिताबर्डी</u> – दिनांक 10.01.19 चे 1400 वा चे सुमारास रामराव पैकुजी मेश्राम, वय 57 वर्ष, रा. प्लॉट नं 162, चंद्रनगर, भगवाननगर, नागपूर हे आपली दुचाकी ने मॉरेस टि पॉईन्ट कडून येत असतांना पो.स्टे. सिताबर्डी हद्दीत गोवारी उडाण पुलाचे उतारावर अचानक प्रकृती खराब

झाल्याने ते गाडी वरून खाली पडले त्यांना उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 10.01.19 चे 1615 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी फिर्यादी सौरभ रामराव मेश्राम, वय 29 वर्ष, याने दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. सिताबर्डी येथे पोउपनि स्थुल, 9850081750 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

5) तहसील – दिनांक 01.01.19 चे 1000 वा चे सुमारास कविता प्रभुदास मेश्राम, वय 50 वर्ष, रा. सिल्केवाडा, वार्ड नं 1, जि. बालाघाट, यांची प्रकृती खराब झाल्याने कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पो.स्टे. तहसील हद्दीत मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 10. 01.19 चे 0745 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. तहसील येथे सपोउपनि हिंगे, 9923070017 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

6) गिट्टीखदान – दिनांक 09.01.19 चे 1050 वा चे सुमारास अंदाजे 40 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम हा पो.स्टे. गिट्टीखदान हद्दीत गिट्टीखदान नागपूर येथे प्रकृती खराब झाल्याने त्याला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 10.01. 19 चे 1145 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषींत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. गिट्टीखदान येथे मपोउपनि राठोड, 9823715358 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर